**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण**
Maharashtra Housing & Area Development Authority
**जनसंपर्क विभाग**
कक्ष क्र. १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर,
वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००५१. दू. क्र. :- ०२२ ६६४०५०७७,
६६४०५०६६ ई मेल - cpromhada@gmail.com

म्हाडा
MHADA

==========================================================================

जावक क्रमांक – ३२५५ दिनांक :- १८ ऑगस्ट, २०२२

<u>प्रसिद्धीपत्रक</u>

# म्हाडाच्या माध्यमातून सर्वसामान्यांना अधिकाधिक परवडणारी घरे उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध - मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे

म्हाडा पुणे मंडळातर्फे ५२११ सदनिकांच्या विक्रीसाठी मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते संगणकीय सोडतीचा शुभारंभ

मुंबई, दि. १८ ऑगस्ट, २०२२ : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) माध्यमातून उत्कृष्ट दर्जा, परवडणाऱ्या दरातील घरे सर्वसामान्यांना मोठ्या प्रमाणात उपलब्ध व्हावीत यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी पुणे मंडळातर्फे सदनिका वितरणाकरिता आयोजित संगणकीय सोडत कार्यक्रमांतर्गत आज केले.

विधान भवनातील समिती सभागृहात पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे (म्हाडाचा घटक) पुणे, सोलापूर व कोल्हापूर जिल्ह्यातील विविध गृहनिर्माण योजनेतील ५ हजार २११ सदनिकांच्या विक्रीकरिता संगणकीय सोडत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे आज काढण्यात आली. यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. या कार्यक्रमास गृहनिर्माण विभागाचे प्रधान सचिव श्री. मिलिंद म्हैसकर, 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अनिल डिग्गीकर, नगरविकास विभागाच्या प्रधान सचिव श्रीमती सोनिया सेठी आदी मान्यवर उपस्थित होते.

श्री. शिंदे पुढे म्हणाले की, ' परवडणाऱ्या दरातील गृहनिर्मितीमध्ये येणारे अडथळे दूर करण्यासाठी शासन सदैव प्रयत्नशील आहे. परवडणारा दर, पारदर्शक संगणकीय सोडत, सदनिकांचा उत्कृष्ट दर्जा, विश्वासार्हता या वैशिष्ट्यांमुळे म्हाडाच्या सोडतींना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. पुणे मंडळाच्या ५ हजार २११ सदनिकांच्या सोडतीसाठी ७२ हजार अर्जदारांनी केलेले अर्ज हे त्याचेच द्योतक आहे. सोडतीमध्ये म्हाडाने विविध प्रवर्गासाठी आरक्षण ठेऊन सामाजिक बांधिलकी जोपासली आहे. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत सर्वांसाठी घरे उपलब्ध करून देण्याचा संकल्प देशाचे प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांनी केला आहे. सदर योजनेला मुदतवाढ देऊन त्या माध्यमातून सर्वसामान्यांची गृह संकल्पपूर्ती होण्यास निश्चितच मदत होईल. आगामी काळात या योजनेला अधिक गती देण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न आहे.'

यावेळी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते अर्जदारांना सोडतीबाबत तपशीलवार माहिती देणाऱ्या माहिती पुस्तिकेचे अनावरण करण्यात आले. सदर माहिती पुस्तिका म्हाडाच्या https://mhada.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असणार आहे.

पुणे मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. नितीन माने यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. यावेळी पुण्याचे विभागीय आयुक्त श्री. सौरभ राव, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. आयुष प्रसाद, म्हाडाच्या मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी श्रीमती सविता बोडके आदी उपस्थित होते.

सोडतीत २० टक्के सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेअंतर्गत एकूण २०८८ सदनिका उपलब्ध करून देण्यात आल्या. पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत ५७५ सदनिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत १५१३

सदनिका, म्हाडा गृहनिर्माण योजनेअंतर्गत २७९ सदनिका, प्रधानमंत्री आवास योजनेतील १७० सदनिका विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या. तसेच म्हाडा गृहनिर्माण योजनेतील प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या योजनेअंतर्गत २ हजार ६७५ सदनिका विक्रीसाठी सोडतीत उपलब्ध करून देण्यात आल्या.

सदनिकांच्या वितरणासाठी म्हाडाने कोणालाही प्रतिनिधी, सल्लागार व प्रॉपर्टी एजंट म्हणून नेमलेले नाही. त्यामुळे नागरिकांनी कोणत्याही भूलथापांना बळी पडू नये, असे आवाहन 'म्हाडा'तर्फे करण्यात येत आहे.

(सही-/)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा




मा. उप मुख्यमंत्री
मा. मुख्यमंत्री

